Exh.50/D

रे.क.नं. ९४/२०२६

**मे. दिवाणी न्यायाधिशसो, कनिष्ठ स्तर, कागल**
**यांचे कोर्टात ...**

**१. सचिन लक्ष्मण जानवे, वगैरे** ... वादी

विरूध्द

**१. नाना जोती कांबळे, वगैरे** ... प्रतिवादी

**यातील प्रतिवादी नं. १, २, ४ ते ९, १२ ते १५, १७, १८, २१ ते २७, ३१, ३३, ३४, ३५, ५२, ५५ ते ६३, ६५, ६६, ६८, ७०, ७१, ७४, ७५, ७८, ७९ व ८१ तर्फे वादीचे नि. ४६ वरील अर्जास म्हणणे पुढीलप्रमाणे –**

१) सदरचा अर्ज चुकीचा, लबाडीचा व खोटा आहे. कायद्याने सदरचा अर्ज चालणेस पात्र नाही.

२) वादीनी प्रस्तुत प्रतिवादी विरूध्द मे. दिवाणी न्यायाधिशसो, वरिष्ठ स्तर, कोल्हापूर यांचेसमोर रे.क.नं. ९२२/२०२५ हा आज्ञार्थी व कायम मनाईकरीता दाखल केला होता. तथापि, मे. वरिष्ठ न्यायालयांचे आदेशाप्रमाणे सदरचे काम सी.पी.सी. ऑर्डर ७ रूल १० प्रमाणे या मे. कोर्टात वर्ग झाले आहे.

३) सदरचे काम वर्ग होत असताना सी.पी.सी.मधील तरतुदीप्रमाणे निव्वळ दावा वर्ग होणे आवश्यक व कायदेशीर होते व आहे.

MADKE AJIT BHISHMA
Digitally signed by MADKE AJIT BHISHMA
Date: 2026.07.13 18:19:42 +0530
Order Seen
CJJD
13/07/2026

तथापि, तसे न होता दावेसोबत अनावश्यक कागदपत्रे व मनाईचा अर्ज देखील या मे. कोर्टात वर्ग झाला आहे. वस्तुत: प्रस्तुत कामासोबत आलेला मनाई अर्ज हा रे.क.नं. ९२२/२०२५ या मे. दिवाणी न्यायाधिश, वरिष्ठ स्तर, कोल्हापूर यांचेसमोरील दावेतील आहे. सदर मनाई अर्जास प्रस्तुत दावेचा म्हणजेच रे.क.नं. ९४/२०२६ हा नंबर मिळालेला नाही व मिळणार देखील नाही. कारण तो रे.क.नं. ९२२/२०२५ या दावेतील मनाई अर्ज आहे. त्याचप्रमाणे प्रस्तुत कामी नि. ३ सोबतची कागदपत्रे देखील रे.क.नं. ९२२/२०२५ या कामातील आहेत. अंतरिम अर्ज, मुदत अर्ज हे सर्व मूळ दावा रे.क.नं. ९२२/२०२५ मधील असलेने सदरची सर्व कागदपत्रे, अंतरिम व तुर्तातुर्त मनाई अर्ज हे देखील परत पाठविणे कायदेशीर होणार आहे.

४) याचाच अर्थ प्रस्तुत कामी नि. ५ वर कोणताही मनाई अर्ज दाखल नाही. त्यामुळे वादींनी नि. ४६ वरील अर्जात केलेली मागणी ही सकृतदर्शनीच चालणेस पात्र नाही असे दिसून येते. त्यामुळे नि. ४६ वरील वादींचा अर्ज फेटाळणे आवश्यक आहे.

५) वादींच्या सदर अर्जातील कलम ३ मधील कथनाप्रमाणे जितकी रक्कम प्रतिवादी यांना अदा केली आहे असे कथन आहे, त्याबाबत कोणताही कागद या मे. कोर्टासमोर उपलब्ध नाही. त्यामुळे सदरची कथने बिनबुडाची व तथ्यहिन स्वरूपाची आहेत. त्या कारणाने वादींचे नुकसान होईल अशी कोणतीही बाब दिसून येत नाही.

६) वादींनी प्रस्तुत अर्जाचे कामी नाम. मुंबई उच्च न्यायालय, खंडपीठ, कोल्हापूर यांचेकडे ए.ओ. नं. १७/२०२६ मधील आदेशाचा आधार घेणेचा प्रयत्न केला आहे. तथापि, मे. दिवाणी न्यायाधिश, वरिष्ठ स्तर, कोल्हापूर यांनी दि. ०६/०५/२०२६ इ. रोजी रे.क.नं. ९२२/२०२५ हा या मे. कोर्टात वर्ग केला आहे. तसेच सदरचे काम वर्ग करताना प्रतिवादी यांनी दि. ०८/०६/२०२६ या तारखेस वादी, प्रतिवादी यांनी हजर राहणेबाबत देखील आदेश केले आहेत.

अशा परिस्थितीत, प्रस्तुत वादी यांनी सर्वोच्च प्रयत्न करून दि. ०८/०६/२०२६ इ. रोजी या मे. कोर्टासमोर हजर असणे आवश्यक आहे. तथापि, मा. उच्च न्यायालय, खंडपीठ, कोल्हापूर यांचेकडील ए.ओ.नं. १७/२०२६ याकामी जैसे—थे परिस्थिती असलेचा व सदर ए.ओ. नं. १७/२०२६ ची तारीख २२/०६/२०२६ अशी असलेने वादी यांनी गैरफायदा घेणेच्या दृष्टीने प्रस्तुतचे रे.क.नं. ९२२/२०२५ चे काम घाईने या मे. कोर्टासमोर घेतले नाही असे सकृतदर्शनी दिसून येते. त्यामुळे विलंबाने येणा—या वादींना मनाईची दाद मागणेचा कोणताही अधिकार नाही अथवा ते सदर अंतरिम मनाईचे आदेशास पात्र नाहीत. त्या कारणाने सदरचा अर्ज मंजूर करणे कायदेशीर होणार आहे.

७) यातील सर्व प्रतिवादी हे शेतकरी आहेत. सदर प्रतिवादींना पुनर्वसन खात्याकडून सदरची जमीन पुनर्वसन म्हणून प्राप्त झालेली होती व आहे. त्यानंतर महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ यांचेकडून देखील दावा मिळकत पुन्हा संपादित करणेत आली.

त्यानंतर प्रतिवादी यांनी वेळोवेळी पाठपुरावा करून दावा मिळकत स्वतःचे नावे संबंधित महामंडळाकडून भाडेपट्टयावर वाटप झाली आहे. अशा परिस्थितीत वादी दावा मिळकत प्रतिवादीकडून भाडेपट्टयाची जमीन खरेदी मागू शकत नाहीत अथवा प्रतिवादी देखील दावा मिळकत खरेदी देवू शकत नाहीत. अशा परिस्थितीत वादींचा दावा चालणेस पात्र नसलेने मनाईचा अर्ज देखील फेटाळणे कायदेशीर होणार आहे.

८) **<u>सबब मे. कोर्टांना विनंती की,</u>**

अ) वादींचा नि. ४६ वरील मनाईचा अर्ज खर्चासह नामंजूर करणेत यावा.

ब) जरूर तर म्हणणे दुरूस्तीस मे. कोर्टाची परवानगी असावी.

क) इतर अनुषंगिक हुकूम याच कामी व्हावेत.

येणेप्रमाणे प्रतिवादी तर्फे म्हणणे असे.

मे. जा. व्हावे.

कागल

दि. १३/०७/२०२६

१) व.मु. विठ्ठल हौलु चव्हाण

२) व.मु. वसंत हालु सांरगळे

३) व.मु. दशरथ कृष्णा सांरगळे